**– सत्र खटला क्र.५५/२०२२ मधील नि.क्र.७५ वरील आदेश –**

(घोषित दि. १५/०३/२०२४)

प्रस्तुतचा अर्ज आरोपी क्र.२ विनोद अधिकराव पोळ यांनी त्यांना लहान गांव, जि. सिरहा, नेपाळ येथे जाण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. आरोपी यांचे असे म्हणणे आहे की , आरोपी क्र. २ यांचे विरुध्द भा.द.वि.कलम ३९५,३२७,४१७,१७०,१२०(ब) सह ३४ प्रमाणे गुन्हा दाखल असून त्याबाबतचा खटला या न्यायालयात प्रलंबित आहे. आरोपी क्र.२ हे गाव मौजे कोतीज, ता.कडेगांव, जि.सांगली येथील रहिवाशी असून तेथे ते त्यांच्या कुटुंबासोबत राहतात . तेथे त्यांच्या कुटुंबाची स्थावर व जंगम मालमत्ता आहे. आरोपी हे मागील ५ ते ६ वर्षापासून नेपाळ येथे आटणी व गाळणीचा व्यवसाय 'महालक्ष्मी गोल्ड ॲण्ड सिल्व्हर टेस्टींग रिफायनरी' या नावाने करतात. आरोपीस सदर प्रकरणात जामीन अर्ज मंजूर झालेला आहे. तसेच मे. न्यायालय यांनी जामीन मंजूर करीत असाना लादलेल्या अटींचे आरोपी आज रोजीपर्यंत कसोशीने पालन करीत आहे. मे न्यायालयाने प्रस्तुत प्रकरण निकाली होईपावेतो देश सोडून न जाण्याची अट घातली आहे. परंतु, आरोपी यांना त्यांच्या व्यवसायाकरिता तसेच नेपाळ येथील एसबीआय बँकेतील खात्या संदर्भातील व्यवहार पूर्ण करणेकरिता आणि त्याचा असलेला व्यवसाय हा भाडयाच्या जागेत असल्यामुळे सदर व्यवसायाच्या अनुषंगाने व्यवसायाचे व्यवस्थापन करण्याकरिता नेपाळ येथे जाणे आवश्यक आहे. तसेच आरोपीवर गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी हे भारतामध्येच आहेत , त्यामुळे त्यांच्या व्यवसायाचे नुकसान झालेले आहे. सबब, आरोपीने प्रत्यक्ष नेपाळ येथे जावून व्यवसायाचे व्यवस्थापन न केल्यास फार मोठे नुकसान होणार आहे.

३. आरोपी यांचे पुढे असे कथन आहेकी , मे. न्यायालयांनी आरोपीस नेपाळ येथे जाण्यास परवानगी दिल्यास आरोपी अशी हमी देतात की , प्रस्तुत प्रकरणाच्या प्रत्येक सुनावणीस ते न्यायालयात नेमल्या तारखेला उपस्थित राहतील . तसेच प्रकरणाच्या

सुनावणीवर आरोपीच्या नेपाळ येथे जाण्याचा कोणताही परिणाम होणार नाही. न्यायालय ज्या अटी व शर्ती लादतील त्याचा भंग होणार नाही , यदाकदचित अटींचा भंग झाल्यास आरोपीचा जामीन कदबा रद्द करण्यास आरोपीची कोणतीही हरकत असणार नाही . सबब, आरोपीस लहान गाव, जि.सिरहा, नेपाळ येथे जाण्याची परवानगी मिळावी., अशी त्यांनी विनंती केली आहे.

४. सरकारी अभियोक्ता यांनी प्रस्तुत अर्जावरच म्हणणे दाखल करुन आरोपी याला परदेशात म्हणजे नेपाळ येथे कोणत्या महिन्यात जायचे आहे हे स्पष्टपणे नमूद केलेले नाही . तसेच आरोपी नेपाळ येथे गेला तर केसच्या सुनावणीवर परिणाम होणार आहे . सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा असे म्हणणे दाखल केलेले आहे.

५. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. आरोपींच्या विद्वान विधिज्ञांतर्फे नि.क्र.७६ चे हमीपत्रा व्यतिरिक्त असाही युक्तिवाद करणेत आला की, आरोपी हे न्यायालयात नेमलेल्या तारखांस स्वतःहून हजर राहतील आणि यदाकदाचित काही अपरिहार्य कारणास्तव न्यायालयात हजर राहू शकणार नसतील तर ते त्यांचे विधिज्ञांमार्फत हजर राहतील. तसेच प्रकरणाच्या सुनावणीवर त्याचा कोणताही परिणाम होवू देणार नाहीत..

६. सरकारी अभियोक्ता श्री. तोडकरी यांनी देखील न्यायीक रितीने असे प्रतिपादन केले की, आरोपी न्यायालयात हजर राहणार असतील किंवा त्यांच्या अनुपस्थितीचा कोणताही परिणाम प्रकरणावर होणार नसेल तर अशा परिस्थितीत, सरकारतर्फे तीव्र हरकत असण्याचे कोणतेही कारण नाही. परंतु, फिर्यादी हे न्यायालयासमोर हजर असून त्यांच्या म्हणण्यानुसार ते केरळमध्ये राहतात. परंतु, आरोपी हे नेपाळमध्ये राहत असल्यामुळे त्यांच्या जिवितास धोका आहे. फिर्यादींच्या या कथनाचा अन्वयार्थ कुठेही लागत नाही. यापुर्वी आरोपींनी त्यांना त्रास दिला व त्यातून त्यांनी तक्रार केली अशा बाबतचा कोणताही पुरावा प्रकरणात दाखल नाही. तसेच फिर्यादी केरळमध्ये राहत असताना आरोपी नेपाळमधून त्याचा व्यवसाय करीत असल्याचा फिर्यादींना कसा त्रास होतो किंवा त्यांच्या जिवितास कसा धोका उत्पन्न

होतो याची स्पष्टता होत नाही. त्यामुळे फिर्यादी केवळ त्यांच्या वैयक्तिक रागापोटी अर्जास विरोध करीत असल्याचे दिसते. सबब, तो विरोध लक्षात घेता येणार नाही. त्यामुळे न्यायाच्या हितासाठी प्रस्तुतचा अर्ज काही अटीस अधीन राहून मंजूर करणेस पात्र आहे. सबब, खालील प्रमाणे आदेश पारित करणेत येत आहे.

## – आदेश –

अर्ज खालील अटी व शर्तीस अधीन राहून मंजूर करणेत येत आहे.

अ) आरोपी क्र.२ विनोद अधिकराव पोळ रा. कोतीज, ता.कडेगांव, जि.सांगली, यांना त्यांच्या व्यवसायाकरिता नेपाळला जाण्यास परवानगी देण्यात येते.

ब) आरोपी यांनी स्वतः किंवा त्यांचे वकिलांमार्फत प्रकरणाचे कामी हजर राहून सुनावणीस सहकार्य करावे.

स्वाक्षरी/–

दिनांक –१५/०३/२०२४
सिंधुदुर्ग – ओरोस.

(श्रीमती सानिका एस.जोशी)
सत्र न्यायाधीश
सिंधुदुर्ग ओरोस.